**<u>साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास प्रथम पक्षकार यांचेतर्फे विधिज्ञ श्री.ए. डी. पाटील यांचेकडून</u>**

४०. प्रस्तुत प्रकरणात यापूर्वी झालेला अंतिम निकाल मा. उच्च न्यायालयात आव्हांनीत केल्यानंतर प्रस्तुतचे प्रकरण पुर्नफैलावर घेण्यात आलेले आहे. मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आदेश मी वाचलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर आदेशाप्रमाणे मी सुधारीत पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सेवानिवृत्तीवेळी मी लिपिक या पदावर काम करत होतो. माझे राहते गाव सडोली आहे. ते नदीकाठयावर वसलेले गाव आहे.

प्रश्न :– तुमचा स्वत:चा जे.सी.बी. आहे ?

उत्तर :– माझे व भाच्यामध्ये घेतलेला आहे.

हे म्हणणे खरे आहे की, तो जे.सी.बी. माझे स्वत:च्या मालकीचा आहे. माझी स्वत:ची शेती आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, माझे पत्नीचे नावे शेती आहे. सदरची शेती मी कसतो. हे म्हणणे खरे नाही की, माझा स्वत:चा दुग्ध व्यवसाय आहे.

४१. मी प्रथम पक्षकार यांचेकडे ३० वर्षे नोकरी केलेली आहे. प्रथम पक्षकार यांचा कारभार कसा चालतो याची मला माहिती आहे. मी प्रशासन विभागात कधीही काम केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वार्षिक सभा संस्थेचे ध्येयधोरण ठरविते व त्याची अंमलबजावणी संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, मला कामावरुन कमी केले तेंव्हा प्रथम पक्षकार संस्था आर्थिक तोट्यात होती. हे म्हणणे खरे आहे की, कोणताही ठराव करण्यापूर्वी संचालक मंडळासमोर कर्मचारी ऑफीस टिपणी ठेवत असतात व त्यानुसार संचालक मंडळ ठराव मंजूर करतात. हे म्हणणे खरे आहे की, ऑफीस टिपणीशिवाय कोणताही ठराव मंजूर होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कर्मचाऱ्याचे सेवानिवृत्तीचे वय कमी करण्याकरीता कर्मचाऱ्यांनी ऑफीस टिपणी संचालक मंडळासमोर ठेवली होती. प्रस्तुत प्रकरणात

दाखल असलेली कादगपत्रे मी माझा पुरावा दाखल करण्यापूर्वी पाहिलेली आहेत. प्रस्तुत प्रकरणात ऑफीस टिपणी व ठराव दाखल आहेत. हे म्हणणे खरे नाही की, कर्मचाऱ्यांच्या शिफारशीनुसार ऑफीस टिपणी ठेवून त्यावेळी प्रथम पक्षकार हे तोटयात असल्यामुळे सेवानिवृत्तीच्या वयाबाबत ठराव झालेला होता. सदर ऑफीस टिपणी तयार करतेवेळी ती ज्या कर्मचाऱ्यांनी किंवा अधिकाऱ्यांनी तयार केली त्यावेळी त्या कर्मचाऱ्यास/ अधिकाऱ्यास प्रथम पक्षकार यांचा खरोखरच तोटा झाला होता का याबाबत मी तोंडी विचारणा केली होती. हे म्हणणे खरे नाही की, ऑफीस टिपणी ठेवली त्यावेळी बरेचसे कर्मचारी सेवानिवृत्तीच्या वयाच्या बदलामुळे सेवानिवृत्त होणार होते. मला सेवानिवृत्तीच्या वयाच्या बदलामुळे सेवानिवृत्त केले होते. सेवानिवृत्तीचे वय बेकायदेशीररित्या कमी केल्याबाबत आमच्या संघटनेने न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. मी वैयक्तीकरित्या तसा दावा दाखल केलेला नाही. बेकायदेशीररीत्या सेवानिवृत्तीच्या वयात बदल केल्याबाबत मा. उच्च न्यायालयात संघटनेने दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रथम पक्षकार यांनी ठरविलेले सेवानिवृत्तीचे वय रद्द करण्याबाबत कोणतेही न्यायालयात दावा दाखल केलेला नव्हता व फक्त वैयक्तीक कर्मचाऱ्यांकरीता दावा दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, संघटनेने जो दावा दाखल केलेला होता त्याचा निकाल मला सेवानिवृत्त करण्यापूर्वी झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, संघटनेने सेवानिवृत्तीच्या वयाबाबत कोणताही दावा दाखल केला नसल्याने व त्या अनुषंगाने कोणताही आदेश प्रथम पक्षकारास नसल्याने मला प्रथम पक्षकाराने रीतसर सेवानिवृत्त केलेले आहे.

४२. मा. उच्च न्यायालयाने दिलेला निकाल मी पाहिलेला आहे. आता मला यादी नि.क्र.सी–१६ वरील अ.क्र.१ ते ३ वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, संघटनेने दाखल केलेल्या दाव्याच्या त्या प्रती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, संघटनेने दाखल केलेल्या दाव्यामध्ये माझा समावेश नव्हता. हे म्हणणे खरे आहे की,

सदरचे दावे त्यासोबत दाखल असलेल्या जोडपत्रात नमूद केलेल्या कामगारांचे वैयक्तीक दावे होते. हे म्हणणे खरे नाही की, संघटनेने दाखल केलेले दावे व त्यामध्ये झालेल्या निकालांचा माझ्याशी वैयक्तीक संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, संघटनेने दाखल केलेल्या दाव्यांचा माझ्याशी कसा संबंध आहे हे मी माझ्या मागणीपत्रात व पुराव्याच्या शपथपत्रात नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा इतकाच दावा आहे की, संघटनेने दाखल केलेल्या दाव्यामध्ये जो निकाल झालेला आहे त्या निकालाचे मलाही फायदे मिळावेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यांच्या निकालाचा व माझा कसा संबंध आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये व माझ्या मागणीपत्रातील कथने वेगवेगळी असल्याने या न्यायालयाने, मा. उच्च न्यायालयाने व मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाप्रमाणे मला कोणतीही रक्कम मागता येणार नाही.

४३. हे म्हणणे खरे आहे की, मी विलंब माफीचा वेगळा अर्ज दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी विलंब माफीचा वेगळा अर्ज दाखल न केल्यामुळे माझा प्रस्तुतचा संदर्भ खारीज होण्यास पात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मागणीपत्रात दिलेली विलंबाची कारणे खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला संचालक मंडळाच्या ठरावानुसार सेवानिवृत्त केल्याने मी वैयक्तीक संचालक मंडळास भेटण्याचे कोणतेही कारण नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणा संचालकांना, कधी, कोणत्या परिस्थितीत व कोणत्या वेळी भेटलो याबाबतचा तपशील माझ्या मागणीपत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी संचालक मंडळाला भेटल्याबाबत व त्यांच्याशी पत्रव्यवहार केल्याबाबत कोणताही पुरावा प्रस्तुत कामी दाखल नाही. मी कोणत्या तारखेस संचालकांना भेटलो तसेच त्यांना एकाचवेळी भेटलो अथवा टप्प्या–टप्प्याने भेटलो हे मला लक्षात नाही. मला सेवानिवृत्त केल्यानंतर महिना दोन महिन्याने आम्ही संचालक मंडळांना १५–२० जणांच्या गटाने भेटलो. हे म्हणणे खरे आहे की, मी

संचालक मंडळाला सन २०१० ते सन २०१८ या कालावधीत कधी–कधी भेटलो याबाबतचा केलेला पत्रव्यवहार प्रस्तुतकामी दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, संचालक मंडळाने ठरावाने मला सेवानिवृत्त केल्यामुळे मी त्यांना भेटण्याचा अथवा त्यांनी मला भेटण्याचे कोणतेही कारण शिल्लक राहत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना भेटलो नसल्यामुळे तसा कागदोपत्री पुरावा दाखल करण्याचा प्रश्नच येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या निष्काळजीपणामुळे प्रकरण दाखल करण्यास विलंब झाल्याने तो माफ होण्यास पात्र ठरत नाही. हे म्हणणे खरे नाही की, विलंब माफ होत नसल्याकारणाने माझा प्रस्तुतचा संदर्भ खारीज होण्यास पात्र आहे.

४४. हे म्हणणे खरे आहे की, कर्मचाऱ्याची सेवा बडतर्फी, सेवानिवृत्ती, राजीनामा व दुर्दैवी मृत्यू यामुळे संपुष्टात येतात. हे म्हणणे खरे आहे की, सेवा संपुष्टात आल्यानंतर कर्मचारी त्या अनुषंगाने कायदेशीर फायदे मिळण्यास पात्र ठरतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम पक्षकार यांच्याकडे कर्मचाऱ्याची सेवा समाप्ती झाल्यानंतर अर्ज करुन त्याची कायदेशीर देणी मागावी लागतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर मागणी केल्यानंतर संबंधीत विभागाचे ना–हरकत प्रमाणपत्र आल्यानंतर रक्कमा अदा केल्या जातात. हे म्हणणे खरे नाही की, उपदान व पी.एफ. मागणी अर्जात सेवा समाप्तीचे कारण नमूद करणे आवश्यक असते. हे म्हणणे खरे आहे की, तसे कारण नमूद केल्यानंतरच कर्मचाऱ्यास उपदान व पी.एफ.ची रक्कम दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, मला उपदान व पी.एफ.ची रक्कम दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आता मला पी.एफ. फंडाकडून पेन्शनही सुरु आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला सेवानिवृत्ती मान्य असल्याने मी प्रथम पक्षकार यांच्याकडून उपदान, पी.एफ. व निवृत्ती वेतन स्वीकारलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सेवा समाप्तीनंतर माझी सेवानिवृत्ती मान्य नाही व मला उपदान व पी.एफ. ची रक्कम मान्य नसल्याबाबतचे पत्र मी प्रथम पक्षकार यांना दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचे प्रकरण दाखल करते वेळीही मी

स्वीकारलेली रक्कम मला मान्य नाही व त्यामुळे ती मी परत करतो असे माझे म्हणणे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत माझ्या मागणीपत्रात व पुराव्याच्या शपथपत्रातही उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सेवानिवृत्ती मान्य असल्यामुळे मी सदरच्या रक्कमा स्वीकारल्या आहेत व त्या प्रथम पक्षकार यांना परत केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सेवानिवृत्तीचे वय कमी करणे हा सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र मिळून घेतलेला निर्णय असल्याने मी सेवानिवृत्ती स्वीकारली होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सेवानिवृत्तीचे वय संमतीने मान्य केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सेवानिवृत्तीचे वय आम्ही संमतीने मान्य केले असल्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण मुदतीत दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सेवानिवृत्तीचे वय सर्व कर्मचा–यांनी संमतीने मान्य केले असल्यामुळे सर्वांनी सेवानिवृत्तीनंतरच्या रक्कमा स्वीकारलेल्या आहेत.

४५. मला प्रथम पक्षकार यांनी सेवानिवृत्तीचा आदेश दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला सेवानिवृत्तीचा आदेश दिल्यानंतर प्रथम पक्षकार यांनी माझ्या अंतिम हिशोबाच्या रक्कमा घेवून जाण्यास कळविले होते. हे मला आठवत नाही की, साधारणपणे सेवानिवृत्तीच्या आदेशातच अंतिम हिशोबाच्या रक्कमा संबंधीत विभागाकडून घेवून जाण्याविषयी कळविले होते. माझा सेवानिवृत्तीचा आदेश माझ्याजवळ असेल तर तो मी सादर करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, मला दि.०४/०२/२०१० रोजी सेवानिवृत्त केले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सेवानिवृत्तीनंतर सन २०१६ मध्ये मी मागणीपत्र प्रथम पक्षकार यांना दिले होते.

४६. आता मला यादी नि.क्र. सी–१४ अ.क्र. १ वरील कागदपत्र दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, मला दिनांक २१/०८/२००६ रोजी सेवानिवृत्त केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर दिनांक १७/०२/२००७ रोजी उपदानाची रक्कम मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला दिनांक ०४/०२/२०१० रोजी सेवानिवृत्ती केले हे दाखविणारा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. मला पी.एफ.ची

रक्कम मिळालेली आहे. सध्या मला पेन्शन सुरु आहे.

४७. आता मला नि.क्र.ओ–१ संदर्भ आदेशासोबत या न्यायालयास प्राप्त झालेली कागदपत्रे दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, प्रथम पक्षकार यांनी मला एक महिन्याची नोटीस देवून सेवानिवृत्त केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कागदपत्रात दाखल असलेल्या मागणी पत्रावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, मागणीपत्रातील मजकूर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, या एक महिन्याच्या कालावधीत संघटनेने दाखल केलेल्या पूर्वीच्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणाचा निकाल झालेला होता. हे म्हणणे खरे नाही की, संघटनेने दाखल केलेल्या तक्रार युएलपी क्र.८७/१९९९, १००/१९९९ व ३१/२००५ या प्रकरणांचा निकाल सन २०१४ पर्यत प्रलंबीत राहू शकत नाही. हे मला आठवत नाही की, मला सेवानिवृत्त केले त्यावेळी सदर प्रकरणांचा स्टेटस/स्थिती काय होती हे मी पाहिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला सेवानिवृत्तीपूर्वी एक महिन्याची नोटीस देवून प्रथम पक्षकार यांनी सदरचा सेवानिवृत्ती आदेश आव्हांनीत करण्याची एक महिना संधी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला एक महिन्याची नोटीस दिल्यानंतर मी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी सदर नोटीस मिळाल्यानंतर काय करावे याबाबत चर्चा केली नव्हती. हे मला माहित नाही की, इतर कामगारांनी दाखल केलेल्या प्रकरणांमध्ये त्यांची मागणीपत्रे ही एकसारखी टंकलेखीत असून केवळ रिकाम्या जागेत माहिती भरलेली आहे. माझे मागणीपत्र कोणी तयार केले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मागणीपत्रातील मजकूर ज्याने अर्ज तयार केला त्याने त्याच्या मताप्रमाणे नमूद केलेला आहे. मी प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेले मागणीपत्र/निवेदन माझ्या विधिज्ञांनी तयार केलेले आहे.

४८. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रथम पक्षकार यांना दिलेले मागणीपत्र व प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेले मागणीपत्र/निवेदन यामध्ये नमूद असलेल्या विलंबाच्या कारणांमध्ये तफावत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रथम पक्षकार यांना दिलेल्या

मागणीपत्रात नमूद केलेल्या विलंबाच्या कारणांची मला माहिती होती व त्यामुळे ती कारणे बरोबर आहेत.

४९. हे म्हणणे खरे आहे की, पी.एफ व उपदानाची रक्कम कर्मचाऱ्याने सेवेत असतानाच मागणी करायची असते व त्यास सेवानिवृत्तीनंतर लगेचच त्यास अदा केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, मी सेवानिवृत्तीनंतर पी.एफ व उपदानाची रक्कम स्वीकारली असल्याने त्या अनुषंगाने माझी सेवा समाप्ती झाल्यामुळे मी दावा करण्याचा हक्क गमावलेला आहे.

५०. हे म्हणणे खरे नाही की, मी मधल्या काळातील पगार मिळण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील सर्व मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वत:हून सेवानिवृत्ती आदेश स्वीकारून नोकरीचा हक्क गमावला असल्याने या न्यायालयाकडून कोणतीही दाद मिळणेस पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेली विलंबाची कारणे खोटी असून मला झालेला विंलब माफ होवून मिळण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, संघटनेने दाखल केलेल्या दाव्यामध्ये व माझ्या प्रस्तुतच्या दाव्यात भिन्न मजकूर नमूद असल्याने संघटनेने दाखल केलेल्या दाव्यातील निकाल प्रस्तुत प्रकरणास लागू होणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/–**

कोल्हापूर. (मधुरा आ.मुळीक)

दि.१२/०९/२०२५. पीठासीन अधिकारी,

कामगार न्यायालय क्र.१, कोल्हापूर.